# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

---

### तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २६ मार्च, २०१८ / चैत्र ५, १९४० ( शके )**

| | | |
|---|---|---|
| (१) | महसूल, मदत व पुनर्वसन, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री | यांचे प्रभारी विभाग |
| (२) | परिवहन, खारभूमी विकास मंत्री | |
| (३) | कृषी, फलोत्पादन मंत्री | |
| (४) | सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री | |
| (५) | पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यविकास मंत्री | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ४१**

---

### गंगाखेड ते राणीसावरगाव (ता.गंगाखेड, जि.परभणी) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(१) * १०७६९९ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.आसिफ शेख (मालेगांव मध्य), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) गंगाखेड ते राणीसावरगाव (ता.गंगाखेड, जि.परभणी) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावरून प्रवास करणे गैरसोयीचे झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची शासनाने पाहणी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे डांबरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२) व (३) प्रश्नाधीन रस्त्यावरील खड्डे भरण्याचे काम पूर्ण करण्यात आले असून वाहतूक सुरळीत चालु आहे. दुरूस्तीची आवश्यक कामे मंजुरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे. सद्यस्थितीत रस्त्यावरून वाहतूक सुरळीत सुरू आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## औरंगाबाद, सिल्लोड व पैठण (जि.औरंगाबाद) या तालुक्यांतील रस्त्यांच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२) * १०५०६९ श्री.शरददादा सोनावणे (जुन्नर), श्री.सरदार तारासिंह (मुलुंड), श्री.अमर काळे (आर्वी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) औरंगाबाद, सिल्लोड व पैठण (जि.औरंगाबाद) या तालुक्यांतील १०० रस्त्यांसाठी जिल्हा नियोजन मंडळाने सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी २० कोटी ५५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला असल्याचे दिनांक २० नोव्हेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या निधीतील काही कोटी रुपयांची कामे न करताच कामे पूर्ण झाल्याचे दर्शवून निधीचा अपहार केल्याबाबतच्या करण्यात आलेल्या तक्रारीनुसार मा.मुख्यमंत्री व मा.वित्त मंत्री यांनी दक्षता व गुणनियंत्रण मंडळास याबाबत चौकशी करण्याचे आदेश दिले असून यातील दोषींवर कारवाई करण्यात येईल असे आश्वासन संबंधित अधीक्षक अभियंता, बांधकाम विभाग यांनी दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी सुरु असलेली चौकशी पूर्ण झाली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त प्रकरणातील दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

जिल्हा नियोजन समितीने औरंगाबाद जिल्ह्यातील सर्व तालुक्यांसाठी सदर प्रमाणे निधी वितरित केला आहे.

(२) शासनाच्या निदेशानुसार मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, औरंगाबाद यांचे मार्फत अधिक्षक अभियंता, दक्षता व गुण नियंत्रण मंडळ, औरंगाबाद यांना सदर प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तसेच, विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांनी देखील याप्रकरणी चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत.

(३), (४) व (५) सदर प्रकरणी चौकशीची व्याप्ती मोठ्या प्रमाणावर असल्याने चौकशीची कार्यवाही सुरू आहे. चौकशीअंतीच्या निष्कर्षानुसार समुचित कार्यवाही करण्याचे नियोजन आहे.

-----------------

## कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील २७ गावांमधील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ देण्याबाबत

**(३) * १०५२९२ श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.नसीम खान (चांदिवली), श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी), श्री.सुनिल केदार (सावनेर), श्री.अमर काळे (आर्वी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.राहुल बोंद्रे (चिखली), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील २७ गावांचा समावेश कल्याण डोंबिवली महानगरपालिकेत दिनांक १ जून, २०१५ रोजी वा त्या सुमारास केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, महानगरपालिकेत समावेश केल्यामुळे माहे जून, २०१५ ते २०१७ अखेरपर्यंतच्या कालावधीत या २७ गावातील शेतकऱ्यांना बी-बियाणे, खते, शेतीची अवजारे यासारख्या शेतीपूरक साहित्यांच्या लाभापासून वंचित ठेवण्यात आले असून कर्जमाफीचाही फायदा देण्यात आला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतकऱ्यांना पॉली हाऊस, शेत नांगरणीचे यंत्र, ट्रॅक्टर खरेदीकरिता देण्यात येणारे अर्थसहाय्य मागील तीन वर्षापासून बंद करण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी दिनांक ११ जुलै, २०१७ रोजी मा.विरोधी पक्षनेता विधानसभा यांनी मा.कृषी मंत्री यांना पत्र पाठवून या २७ गावातील शेतकऱ्यांना मदत करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले व त्यानुसार या २७ गावातील शेतकऱ्यांना कृषी विभागाच्या योजनांचा लाभ देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) दि. १४ मे, २०१५ च्या अधिसूचनेन्वये समावेश करण्यात आला आहे.

(२) नाही

(३) नाही.

(४) मा. विरोधी पक्षनेता यांचे पत्र मा. मंत्री (कृषी) यांचे कार्यालयात प्राप्त झाल्याचे आढळून येत नाही.

(५) महानगरपालिकेत समाविष्ठ केलेल्या गावांना कृषी विभागांतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ देण्यात आला आहे.

-----------------

## वाशिम-रिसोड (जि.वाशिम) या रस्त्यावरील चिंचबापेन येथील पुलाची दुरुस्ती करण्याबाबत

**(४) * ११५८८८ श्री.अमित झनक (रिसोड) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाशिम-रिसोड (जि.वाशिम) या महत्वाच्या रस्त्यावरील चिंचबापेन येथील पुलाची दुरवस्था झाल्यामुळे अपघात घडण्याची शक्यता निर्माण झाली असून या पुलाच्या दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष झाले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर पुलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत तसेच याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२), (३) व (४) प्रश्नांकित रस्ता बेलखेड- मसलापेन-सोनाटी प्रजिमा २४ चा भाग आहे. चिंचाबेन गावाजवळ या रस्त्यावर पूल नसून दगडी ढापा (panel dip) आहे. तो पूर्णपणे बंद झाला आहे.यामुळे रस्त्यास व रस्त्यावरील वहातूकीस कोणताही अडथळा येत नाही.

सदर ढाप्याच्या (panel dip) ठिकाणी नविन पाईप मोरी बांधण्याचे काम मंजूरी, निधी, निकष व प्राधान्यक्रमानुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

-----------------

## शाहुवाडी, राधानगरी व कागल (जि.कोल्हापूर) या तालुक्यांतील अवैध उत्खननाबाबत

**(५) * ११०६९४ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शाहुवाडी, राधानगरी व कागल (जि.कोल्हापूर) या तालुक्यांतील डोंगराळ भागात मुरुम, खडी व दगडांचे अवैध उत्खनन करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यांत अवैध उत्खनन करणाऱ्यांवर कारवाई करून अवैध उत्खननास प्रतिबंध करण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) कोल्हापूर जिल्ह्यात शाहुवाडी, राधानगरी व कागल तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(२) व (३) कोल्हापूर जिल्ह्यामध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत जिल्ह्यात गस्ती घालण्यात येत असून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

कोल्हापूर जिल्ह्यातील शाहुवाडी, राधानगरी व कागल तालुक्यात दि. १ एप्रिल, २०१७ ते ३१ जानेवारी, २०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध वाहतूकीच्या ४३ प्रकरणांमध्ये दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ५,०६,६९५/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## तुळजापूर (जि.सोलापूर) शहर वळण रस्त्यासाठी शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीचा वाढीव मोबदला देण्याबाबत

**(६) * ११३१७२ श्री.मधुकरराव चव्हाण (तुळजापूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर-नांदेड या रा.म.मा.क्र.३६१ च्या चौपदरीकरणाच्या कामामधील तुळजापूर शहर वळण रस्त्याच्या कामासाठी तुळजापूर, हगरगा तुळ, सिंदफळ, मोर्डा, तडवळा, काक्रंबा या गावातील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी रुपये ८ ते १३ हजार प्रती गुंठा दराने संपादित करण्यात आल्या आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वास्तविकतः या भागातील शेतजमिनी बागायती असल्यामुळे जास्त दर मिळणे आवश्यक असताना अत्यल्प दर देण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त जमिनींसाठी शेतकऱ्यांना वाढीव मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

सदर प्रकरणी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ चे तरतुदीस अनुसरून नियमानुसार मोबदला निश्चित करण्यात आला आहे.

(२) हे खरे नाही.

राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६, नुसार सदरील गावांचे निवाडे जाहीर करण्यात आले असुन नियमानुसार दर निश्चित करण्यात आले आहेत.

(३) व (४) घोषित निवाड्यामधील दराबाबत तक्रार असल्यास त्यासाठी राष्ट्रीय महामार्ग अधिनियम, १९५६ अंतर्गत लवादाकडे (Arbitrator) दाद मागण्याची तरतुद आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## उमापूर (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकऱ्यांना पीक विम्याची रक्कम देण्याबाबत

**(७) * ११०१२६ श्री.लक्ष्मण पवार (गेवराई) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उमापूर, (ता.गेवराई, जि.बीड) येथील शेतकऱ्यांच्या खात्यातून प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत कापूस पीकाच्या विम्याची सन २०१६-२०१७ च्या हप्त्याची रक्कम भारतीय स्टेट बँकेने कपात केली असतानाही अद्यापपर्यंत शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कम मिळाली नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उमापूर मंडळाच्या पीक विम्यात झालेल्या चुकांची दुरुस्ती करून पीक विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.कृषी मंत्री यांच्याकडे दिनांक ८ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास निवेदनान्वये केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोकप्रतिनिधींच्या निवेदनाच्या अनुषंगाने सन २०१६-२०१७ च्या कापूस पीकाच्या विम्याची रक्कम शेतकऱ्यांना देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे खरे आहे.

भारतीय स्टेट बँक शाखा उमापूर यांनी खरीप हंगाम २०१६ मध्ये प्रधानमंत्री पीक विमा योजनेंतर्गत सहभाग घेतलेल्या कापूस पिकाच्या १५६२ शेतकऱ्यांचे महसूल मंडळ उमापूर ऐवजी बीड असे चुकीने नमुद केल्यामुळे उमापूर महसूल मंडळातील या शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देय झाली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

श्री.लक्ष्मण पवार, वि.स.स. यांचे दि.८ सप्टेंबर, २०१७ चे पत्र मा.मंत्री (कृषि) यांना प्राप्त झालेले आहे.

(३) स्टेट बँक ऑफ इंडिया शाखा उमापूर यांना कृषि आयुक्तालयाचे पत्र क्र. एच.डी/स्टॅट-८/पिएमएफबीवाय/६४ दि. ३०.०१.२०१८ अन्वये पात्र शेतकऱ्यांना नुकसान भरपाई अदा करणे बाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मा.अपर मुख्य सचिव (कृषि) यांच्या स्तरावरुन दि.८.०३.२०१८ च्या पत्रान्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर शहर ते वसई-विरार उपविभाग (जि.पालघर) यांना जोडणाऱ्या मुख्य रस्त्याच्या बांधकामाबाबत

**(८) * ११०३९८ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्ह्याची स्थापना दिनांक १ ऑगस्ट, २०१४ रोजी झाली असूनही अद्यापपर्यंत पालघर शहर ते वसई-विरार उपविभाग (जि.पालघर) यांना जोडणारा मुख्य रस्ता बांधला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या रस्त्याचे तातडीने बांधकाम करण्याबाबतचे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक ९ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्या सुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांना दिले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, त्यानुसार सदर रस्त्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.
(२) होय.
(३) होय.
(४) प्रस्तुत रस्त्याचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वायंगणी मसुरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील कालावल खाडीपात्रातील अवैध उत्खननाबाबत

**(९) * ११५७६९ श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वायंगणी मसुरा (ता.मालवण, जि.सिंधुदुर्ग) गावातील कालावल खाडीपात्रातील गट क्र. ८१ आणि ८४ या दोन्ही गटात अवैधरीत्या करण्यात येत असलेल्या वाळू उत्खननाबाबत वायंगणी-धामणवाडी येथील ग्रामस्थांनी तसेच ग्रामपंचायतीने तहसीलदार, मालवण, खनिकर्म अधिकारी, सिंधुदुर्ग व जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांच्याकडे दिनांक २४ जानेवारी, २०१८ रोजी व तत्पुर्वी वारंवार निवेदनाद्वारे तक्रारी करुन संबंधित वाळू माफियांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत कोणतीही कार्यवाही न केल्याने दिनांक ६ फेब्रुवारी, २०१८ रोजी वायंगणी येथील ग्रामस्थांनी धामणवाडी रस्त्यावर मोठ मोठे दगड ठेवून रास्ता रोको आंदोलन केले, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदरहू ठिकाणी अवैधरीत्या वाळू उपसा करणाऱ्या वाळू माफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) वायंगणी/मसुरा गावामधील कालावल खाडी पात्रातील वाळूपट्टा गट क्र.सी-१ आणि सी-४ मधून वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक, वाळू वाहतूक करणाऱ्या वाहनांमुळे होणारा धुळीचा त्रास, रात्रीचे वेळी वाहतूक होत असल्याबाबतची तक्रार सरपंच, ग्रामपंचायत वायंगणी यांनी जिल्हाधिकारी, सिंधुदूर्ग यांचेकडे दि.२४/१/२०१८ रोजी केली आहे. तथापि, वायंगणी येथील ग्रामस्थांनी रस्तारोको आंदोलन केल्याची बाब निदर्शनास आली नाही.
(३) व (४) कालावल खाडीपात्रातील वाळूगट क्र.बी-३, बी-४, सी-१, सी-४ व डी-१ मधून एकूण १० वाळू परवानाधारकांना ६१,७८७ ब्रास परिमाणाच्या उत्खननासाठी परवानगी देण्यात आली असून सदर ठिकाणी वाळूचे अवैध उत्खनन झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नंदूरबार जिल्हयात गौण खनिजांची अवैध वाहतूक सुरु असल्याबाबत

**(१०) * १०८४१७ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात वाळू उत्खनन करताना पर्यावरण संवर्धनाची काळजी घेतली जात नसल्याने वाळू घाटांचे लिलाव स्थगित करण्याचे आदेश मा.उच्च न्यायालयाच्या नागपुर खंडपीठाने दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, न्यायालयाने स्थगिती दिली असतानासुद्धा नंदूरबार जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अवैध गौण खनिजांची वाहतुक करण्यात येत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये व त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार नंदूरबार जिल्ह्यात अवैधरीत्या गौण खनिजांची वाहतुक करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहे ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

मा.मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दि.२१/१२/२०१७ रोजी पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) व पर्यावरणीय व्यवस्थापन योजना (EMP) याशिवाय वाळू लिलावाची सुरु असलेली प्रक्रिया करण्यास न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली होती.

(२), (३) व (४) नंदूरबार जिल्हा गुजरात राज्याच्या सीमेलगत असल्याने गुजरात राज्यातून वाळूची वाहने नंदूरबार जिल्ह्यात वाहतूक करीत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने माहे जानेवारी, २०१८ मध्ये अवैध वाहतूक करणाऱ्या ५६ वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ९,५३,२९५/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. तसेच नंदूरबार जिल्ह्यामध्ये गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी तालुकास्तरावर पथके स्थापन करण्यात आली आहेत. सदर पथकामार्फत जिल्ह्यात गस्ती घालण्यात येत असून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येते.

नंदूरबार जिल्ह्यात दि.१ एप्रिल, २०१७ ते २८ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २७२ प्रकरणांमध्ये दंडात्मक कार्यवाही करुन रुपये ७०,९३,६२०/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मालवण-कसाल (जि.सिंधुदुर्ग) या रस्त्यावर अनधिकृतरित्या केबल टाकल्याबाबत

**(११) * ११२२१५ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालवण-कसाल (जि.सिंधुदुर्ग) राज्य महामार्ग क्र. ११७ च्या लगत टाकण्यात आलेली ओ.एफ.सी. केबल सदरहू रस्त्याच्या मध्यापासून १५ मीटरच्या आत टाकुन संबंधीत कंपनीने अटी व शर्तीचा भंग केल्याने सदरहू केबल ३ महिन्यांच्या आत काढून टाकण्याचे निर्देश कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, सावंतवाडी यांनी माहे ऑगस्ट, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू निर्देशानुसार या रस्त्यावरील ओ.एफ.सी. केबल अद्यापपर्यंत काढून टाकण्यात आलेली नाही आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार संबंधित जबाबदार अधिकारी व कंपनीवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे आहे.

(२) हे ही खरे आहे.

(३) व (४) मे.रिलायन्स जिओ इन्फोकॉम प्रा.लि. या कंपनीने स्वखर्चाने आप्टीकल फायबर काढुन घेण्यात यावी, अन्यथा कंपनीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, अशी दि.२२.०८.२०१७ च्या पत्रान्वये नोटीस देण्यात आली. तसेच, दि.२२.०२.२०१८ रोजी कंपनीस अंतीम नोटीस देण्यात आली आहे. सदर कंपनीने विहीत मुदतीत केबल न काढल्यास विभागामार्फत उचित कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

## पारनेर (जि.अहमदनगर) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात विद्यार्थी पास विक्रीत झालेला गैरव्यवहार

**(१२) * १०६५६२ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पारनेर (जि.अहमदनगर) येथील राज्य परिवहन महामंडळाच्या आगारात विद्यार्थांच्या सवलतीच्या पासांची परस्पर विक्री करुन सुमारे २ लाख ६० हजार रुपयांचा अपहार केल्याचे दिनांक १७ जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी दोन कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले असून या गैरव्यवहारामध्ये आणखी किती कर्मचारी व इतर व्यक्तींचा समावेश आहे,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती या प्रकरणातील संबंधित दोषींविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय. सदर अपहार दि.३०.१०.२०१७ रोजी पास तपासणी दरम्यान निदर्शनास आला आहे.

(२), (३) व (४) सदर अपहार प्रकरणी राज्य परिवहन महामंडळाद्वारे प्रत्यक्ष दोषी असणाऱ्या श्री.नानेकर व श्री.सातपुते या दोन्ही वाहकांना निलंबित करण्यात येवून, त्यांना आरोपपत्र देण्यात आले आहे.

तसेच, यामध्ये वेळोवेळी तपासणी न केल्यामुळे आगारातील लेखाकार, वाहतुक निरीक्षक व रोखशाखेत काम करणाऱ्या दोन वाहकांना चौकशीअंती जबाबदार धरण्यात आले असून, त्यांच्यावर खात्यामार्फत प्रमादिय कारवाई चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## खानापूर व तासगाव (जि.सांगली) तालुक्यातील द्राक्ष बागांचे झालेले नुकसान

**(१३) * १०८४८१ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर व तासगाव (जि.सांगली) तालुक्यांतील दोन हजार हेक्टरहून अधिक द्राक्ष बागांचे बदलेल्या नैसर्गिक वातावरणामुळे नुकसान झाले असतानाही या द्राक्षाच्या बागांचे पंचनामे करुन द्राक्ष बागायतदारांना मदत देण्यात आली नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या द्राक्ष बागांच्या नुकसानीची पाहणी शासनाने केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार द्राक्ष बागायतदारांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) व (२) अंशत: खरे आहे.

मदत व पुनर्वसन विभागाच्या दि. ३०/११/२०१७ च्या निर्देशानुसार माहे एप्रिल, २०१७ ते ऑक्टोंबर, २०१७ अखेरच्या शेती व फळपिकाच्या नुकसानीचे पंचनामे करुन जिल्हाधिकारी, सांगली यांनी विभागीय आयुक्तांना अहवाल सादर केला आहे.

तसेच हवामान आधारित फळपिक विमा योजनेतील निकषानुसार खानापूर व तासगाव तालुक्यातील सुमारे ५ महसुल मंडळामध्ये अवेळी पाऊस हा हवामान धोका लागू झाला आहे.

(३) व (४) स्वयंचलित हवामान यंत्रावरील प्राप्त हवामान नोंदीनुसार हवामान धोका लागू झाल्यावर विमा धारक पात्र शेतकऱ्यांना देय भरपाईची रक्कम संबंधित विमा कंपन्याकडून अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.

-----------------

## मौजे भामाठाण (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) येथील पूरग्रस्त शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत

**(१४) * ११५८१९ श्री.भाऊसाहेब कांबळे (श्रीरामपूर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे भामाठाण (ता.श्रीरामपूर, जि.अहमदनगर) येथील गोदावरी नदीला माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये आलेल्या पूरामुळे २०० शेतकऱ्यांच्या पिकांच्या झालेल्या नुकसानीबाबत तहसिलदार, श्रीरामपूर यांनी पंचनामे केले असून येथील विमाधारक शेतकऱ्यांची यादी एचडीएफसी इन्शुरन्स कंपनीला सादर करुनही सदर कंपनीकडून शेतकऱ्यांना अद्याप नुकसान भरपाई मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शेतकऱ्यांनी शासनाने हस्तक्षेप करुन सदर कंपनीकडून पीक नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत चौकशी करुन पूरग्रस्त शेतकऱ्यांना सदर विमा कंपनीकडून पीक नुकसान भरपाई मिळवून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे. भामाठाण येथील सदर नुकसानग्रस्त २०० शेतकऱ्यांपैकी प्रत्यक्षात ५६ शेतकऱ्यांनी एचडीएफसी इर्गो कंपनीकडे विमा हप्ता भरुन विमा संरक्षण घेतलेले होते. विमा कंपनीने १८ शेतकऱ्यांचे विमा दावे मंजूर करुन नुकसान भरपाई बाधीत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात वर्ग केलेली आहे. नुकसानीची सूचना विमा कंपनीस उशीरा मिळाल्याने शासन निर्णयातील तरतूदीनुसार उर्वरित ३८ शेतकऱ्यांना विमा कंपनीने नुकसान भरपाई दिलेली नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनूसार पुराचे पाणी शेतात शिरुन झालेल्या नुकसानीस स्थानिक नैसर्गिक आपत्ती या जोखीमीच्या बाबी अंतर्गत विमा संरक्षण देण्यात येते. तथापि, सदरचे नुकसानीबाबत विमा

कंपनीस नुकसान झाल्यापासून ४८ तासांचे आत कळविणे बंधनकारक आहे. माहे ऑगस्ट, २०१६ मध्ये पुर परिस्थितीमुळे मौजे भामाठाण येथील पीक विमा योजनेंतर्गत सहभागी झालेल्या ५६ शेतकऱ्यांपैकी १८ शेतकऱ्यांनी नुकसानीची सुचना विमा कंपनीस ४८ तासाच्या आत कळविल्याने सदर १८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई विमा कंपनीने मंजूर केलेली असून नुकसान भरपाई रक्कम त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा केलेली आहे. नुकसानीची सूचना विमा कंपनीस उशीरा मिळाल्याने उर्वरित ३८ शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देय होत नाही अशी भूमिका विमा कंपनीने घेतलेली होती.तथापि, आयुक्त (कृषि) यांचेकडे झालेल्या बैठकीत आता विमा कंपनीने नुकसान भरपाई देण्यास सहमती दर्शविलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईतील तीन हजार सहकारी गृहनिर्माण संस्थांनी शासकीय शुल्क भरले नसल्याबाबत

**(१५) * १०९८१७ श्री.अतुल भातखळकर (कांदिवली पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील तीन हजार सहकारी गृहनिर्माण संस्थांनी शासकीय शुल्क भरले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी याबाबत सहकारी गृहनिर्माण संस्थाना नोटीसा पाठविल्या असून संस्थांच्या पदाधिकाऱ्यांना सदनिकेचे हस्तांतरण, भाडेतत्वावर देणे अथवा गहाण ठेवण्यासाठी कोणत्याही प्रकारची ना हरकत प्रमाणपत्रे देऊ नये असेही आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त संस्थांकडून सदर शुल्क वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) व (२) प्रदान केलेल्या अथवा भाडेपट्ट्याने दिलेल्या शासकीय जमिनींवरील मुंबई उपनगर जिल्ह्यातील काही सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील काही सदनिकाधारकांनी सदनिकांच्या हस्तांतरण, तारण व इतर बाबींसाठी शासनास देय असलेले आकार, शुल्क, अधिमुल्य शासन जमा केले नसल्याचे निदर्शनास आले आहे.

प्रदान केलेल्या अथवा भाडेपट्टयाने दिलेल्या शासकीय जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदनिका, गाळे हस्तांतरीत करतांना, तारण ठेवतांना अथवा पोटभाड्याने देताना सक्षम प्राधिकाऱ्याची पूर्वपरवानगी आवश्यक असून अशी पुर्वपरवानगी न घेता व आवश्यक शुल्क, आकार, फी न भरता केलेला असा व्यवहार अवैध ठरतो ही बाब सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणण्याच्या दृष्टीने याबाबतचे प्रचलित नियम, धोरणे जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांनी संबंधीत सहकारी गृहनिर्माण संस्थांना पत्रान्वये कळविली आहेत. तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाचे पूर्वपरवानगीशिवाय व विहित शुल्क शासन जमा झालेशिवाय कोणत्याही सभासदास सदनिका/गाळे हस्तांतरण करणे, भाड्याने देणे, वित्तीय संस्थेस तारण ठेवणे या प्रयोजनाकरीता ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये असे कळविले आहे.

(३), (४) व (५) शासनाने प्रदान केलेल्या जमिनींवरील सहकारी गृहनिर्माण संस्थांमधील सदस्यास सदनिका/गाळा हस्तांतरीत करावयाचा असल्यास, तारण ठेवावयाचा असल्यास अथवा पोटभाड्याने द्यावयाचा असल्यास त्यासाठी परवानगी देतांना प्रचलित तरतुदींप्रमाणे आकार, शुल्क, फी भरुन घेऊनच परवानगी दिली जाते. पुर्वपरवानगीशिवाय झालेले सदनिकांचे असे व्यवहार निदर्शनास आल्यानंतर त्यांचेकडून प्रचलित तरतुदींप्रमाणे वसूलीची कार्यवाही केली जाते.

-----------------

## मळवंडी ठुले (ता.मावळ, जि.पुणे) येथील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पर्यायी जमिनीसह भु-भाडे व उदरनिर्वाह भत्ता देण्याबाबत

**(१६) * ११६४४३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मळवंडी ठुले (ता.मावळ, जि.पुणे) येथील प्रकल्पासाठी १९९७ साली संपादित केलेल्या जमिनींसाठी पर्यायी जमीन, भु-भाडे व उदरनिर्वाह भत्ता संबंधित प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मागील २१ वर्षापासून देण्यात आला नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांसाठी स्वतंत्र लाभ क्षेत्र नसल्याने त्यांचे पुनर्वसन चासकमान क्षेत्रात करण्यात यावे असा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी दिनांक ३० ऑगस्ट, २००० रोजी दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना शासनाकडून मंजूर करण्यात आलेली जमीनही चासकमान प्रकल्पाच्या मंजूर आराखड्यातील असून सदर आराखड्यातील जमीन मळवंडी ठुले प्रकल्पासाठी देण्यास यापूर्वीच मान्यता देण्यात आलेली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर चासकमान प्रकल्पातील पुनर्वसनग्रस्तांना मौजे डिग्रजवाडी, (ता.शिरूर) येथील पुनर्वसनासाठी राखीव जमिन वाटपासाठी जी कब्जे हक्काची रक्कम आकारण्यात आली तीच कब्जेहक्काची रक्कम मळवंडी ठुले प्रकल्पग्रस्तांसाठी आकारणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(५) तसेच, सदर प्रकल्प बाधीतांना महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९८६ लागू असल्याने व सदर धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या बुडीत संपादीत झालेल्या शेतजमिनी वर्ग-१ च्या असल्याने पुनर्वसनामध्ये देखील त्यांना वर्ग-१ जमिनी वाटप होणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(६) असल्यास, सदर प्रकल्पग्रस्तांना दिनांक ०५ डिसेंबर, २०१७ च्या पत्रानुसार चासकमान प्रकल्पातील मौजे डिग्रजवाडी (ता.शिरूर) येथील जमीन गट न.२३९ मधील क्षेत्र प्रकल्पग्रस्तांचे पात्रतेनुसार अनुज्ञेय असलेल्या क्षेत्र वाटपाची कार्यवाही यथाशिघ्र करण्याबाबतचा शासन आदेश होऊन तीन महिन्यांचा कालावधी उलटूनही अद्याप क्षेत्रवाटपाचे आदेश व ताबा देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,

(७) असल्यास, याबाबत चौकशी करुन सदर प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा ताबा देण्याबाबत तसेच पूर्वीच्या संपादन दराप्रमाणे कब्जेहक्काची रक्कम वसूल करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) होय, हे खरे आहे.

(३) हे खरे नाही. तथापि, अर्जदार श्रीमती. सिंधुबाई मारुती ठुले व इतर यांची प्रकल्पग्रस्त म्हणून पात्रता तपासून मौजे डिग्रजवाडी, ता. शिरुर जि. पुणे येथील गट नं २३९ मधील अनुज्ञेय क्षेत्र वाटपास दि. ५.१२.२०१७ च्या पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली असून अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. १४.३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये अनुज्ञेय पर्यायी जमीनीचे वाटप केले आहे.

(४) मळवंडी ठुले प्रकल्पग्रसतांना वाटप झालेल्या जमिनी संदर्भात अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांच्या दि. १४.३.२०१८ च्या आदेशान्वये कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) यासंदर्भात दि. २०.७.२०१२ च्या शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करण्याबाबतच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

(६) हे खरे नाही. अर्जदार श्रीमती सिंधुबाई मारुती ठुले व इतर यांची प्रकल्पग्रस्त म्हणून पात्रता तपासून मौजे डिग्रजवाडी, ता. शिरुर जि. पुणे येथील गट नं २३९ मधील अनुज्ञेय क्षेत्र वाटपास दि. ५.१२.२०१७ च्या पत्रान्वये शासन मान्यता देण्यात आली असून अप्पर जिल्हाधिकारी, पुणे यांनी दि. १४.३.२०१८ रोजीच्या आदेशान्वये अनुज्ञेय पर्यायी जमीनीचे वाटप केले आहे.

(७) उपरोक्त प्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

-----------------

## ठाणे जिल्ह्यातील खाणपट्टाधारकांनी मंजुर परिमाणापेक्षा जास्त गौण खनिजांचे उत्खनन केल्याबाबत

**(१७) * ११४३१० श्री.महेश चौघुले (भिवंडी पश्चिम), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.दिपक चव्हाण (फलटण), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील ७० दगडखाण पट्टाधारकांनी परिमाणापेक्षा जास्त उत्खनन करुन शासनाचा कोट्यवधी रुपयांचा महसूल बुडविला असल्याची माहिती माहे डिसेंबर, २०१७ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हाधिकारी ठाणे यांनी उक्त दगडखाण पट्टाधारकांवर नोटीसा बजावून त्यांच्याकडून २३ कोटींचा दंडही वसूल केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केलेली आहे काय व चौकशीचे निष्कर्ष काय आहेत,

(४) असल्यास, त्यानुसार उक्त दगड्खाण पट्टाधारकांवर कारवाई करून भविष्यात असे प्रकार घडू नये याची दक्षता घेण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील एकूण ८९ दगडखाणींची मोजणी भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय यांचेमार्फत दि.२०/५/२०१७ ते २५/५/२०१७ या कालावधीत प्रत्यक्ष सर्वेक्षण करण्यात आले असता, सदरील तपासणीमध्ये ४३ खाणपट्टाधारकांनी मंजूर परिमाणापेक्षा जास्त गौण खनिजाचे उत्खनन केल्याचे आढळून आले.

याकरीता जिल्हा खनिकर्म अधिकारी, ठाणे यांनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये ४३ खनिपट्टाधारकांना रू.२३.९३ कोटी एवढ्या दंडाची नोटीस बजावली. सदर नोटीसीच्या अनुषंगाने खाणपट्टाधारकांनी सादर केलेले पुरावे व खुलासे विचारात घेवून २२ खाणपट्टाधारकांकडून रू.४०,५९,१४९/- एवढी अतिरीक्त स्वामित्वधनाची रक्कम वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत २१ खाणपट्टाधारकांनी सादर केलेले पुरावे व लेखी युक्तीवाद छाननी करून अंतिम आदेश पारीत करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे शिवणे (ता.मावळ, जि.पुणे) येथील शासकीय जागेवर अतिक्रमण केल्याबाबत

**(१८) * ११४०६९ श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे शिवणे (ता.मावळ, जि.पुणे) येथील सर्व्हे नं. ८९, ९०, ९१ व ९२ मधील शासकीय जागेवर वॉल कंपाऊंड बांधून अनधिकृतपणे अतिक्रमण करण्यात आल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या अतिक्रमणाकडे संबंधित प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार सदर जागेवर अतिक्रमण करणाऱ्यांवर तसेच त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) मौजे शिवणे, ता.मावळ, जि.पुणे येथील सर्व्हे नं. ८९, ९०, ९१ व ९२ ही जमीन खाजगी मालकीची असून सदर जागेवर वॉल कंपाऊंड बांधून अनधिकृतपणे अतिक्रमण करण्यात आल्याचे निदर्शनास आलेले नाही.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घटप्रभा व ताम्रपर्णी (जि.कोल्हापूर) नदीवर पूल बांधणेबाबत

**(१९) * १०७२५१ श्रीमती संध्यादेवी देसाई-कुपेकर (चंदगड), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्रीमती सुमन पाटील (तासगाव - कवठेमहांकाळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डोणेवाडी (ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापूर) येथे घटप्रभा नदीवर पूल नसल्याने शालेय विद्यार्थ्यांना तसेच रुग्णांना व इतर नागरिकांना तरफावरुन अथवा होडीने दुसऱ्या गावांतील शाळा व रुग्णालयात जावे लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच चंदगड (जि.कोल्हापूर) तालुक्यातील ताम्रपर्णी नदीवरील पूल पावसाळयात पुराच्या पाण्याखाली जात असल्यामुळे तीन ते चार दिवस वाहतूक ठप्प होत असते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही ठिकाणी पूल बांधण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांच्याकडे गत २ वर्षापासून सातत्याने मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत चौकशी करून घटप्रभा व ताम्रपर्णी नदीवर उक्त ठिकाणी पूल बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय.

(२) होय.

(३) होय.

घटप्रभा नदीवरील पूलाबाबत दि.२१.७.२०१७ व दि.१४.१२.२०१७ रोजीची निवेदने तसेच ताम्रपर्णी नदीवरील पूलाबाबत दि.२५.४.२०१७ व दि.२८.१२.२०१७ रोजीची निवेदने प्राप्त झाली आहेत.

(४) घटप्रभा नदीवरील पूल हा ग्रामीण मार्ग दर्जाच्या रस्त्यावर असून पूलाच्या जोडरस्त्यासाठी जमिनीचे भूसंपादन आवश्यक आहे. प्रस्तुत पुलाचे काम नाबार्ड अंतर्गत निकष, मंजूरी व निधीच्या उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

ताम्रपर्णी नदीवरील पूल हा राज्यमार्ग दर्जाच्या रस्त्यावर असल्याने प्रस्तुत पुलाचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन राहील.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातील गोदावरी नदी पात्रातून होत असलेला अवैध वाळू उपसा

**(२०) * ११५९११ श्री.संतोष दानवे (भोकरदन) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पैठण (जि.औरंगाबाद) तालुक्यातून वाहणाऱ्या गोदावरी नदी पात्रातून बैलगाड्यांचा वापर करून अवैधरीत्या वाळू तस्करी सुरू असून या वाळू माफियांनी गोदावरी नदीकडे जाणाऱ्या रस्त्यावर महसूल प्रशासनाने वाळू चोरांना रोखण्याकरिता खोदलेले चर बुजविले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यातील गोदावरी नदीच्या पात्रात अवैध उत्खनन करणाऱ्या वाळू माफियांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही.

(२) व (३) वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीस प्रतिबंध करण्यासाठी पैठण तालुक्यात भरारी पथकाची स्थापना करण्यात आली असून सदर पथकामार्फत पैठण तालुक्यात माहे १ एप्रिल, २०१७ ते २८ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत वाळूच्या अवैध वाहतूकीच्या २० प्रकरणात दंडात्मक कार्यवाही करुन रु.६,८८,०४०/- इतकी रक्कम शासनजमा करण्यात आली असून २ प्रकरणात ८ व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील मिलमीली नदी पात्रातून अवैध वाळू उपसा होत असल्याबाबत

**(२१) * ११३७८६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगाव खंडेश्वर (जि.अमरावती) तालुक्यातील अमरावती व यवतमाळ या दोन्ही जिल्ह्याच्या सीमेवरील मिलमिली नदीपात्रात अवैध उत्खनन करुन वाळूची मोठ्या प्रमाणात वाहतूक सुरु असल्याचे दिनांक २ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अवैध उत्खनन व वाळूच्या वाहतुकीकडे महसूल प्रशासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करीत असल्यामुळे तसेच एक ट्रक वाळूच्या रॉयल्टीवर चार ट्रक वाळूची वाहतूक करण्यात येत असल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचे नुकसान होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार उक्त नदीपात्रात अवैध वाळू उपसा करणाऱ्या वाळूमाफियांवर व याकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) अशा आशयाची बातमी दि. २ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या वृत्तपत्रामध्ये प्रसिध्द झाली होती.

वाळूचे अवैध उत्खनन व वाळूच्या वाहतुकीवर प्रतिबंध करण्यासाठी पथके गठीत करण्यात आली असून चेकपोस्ट देखील स्थापन करण्यात आले आहेत. त्यांच्या माध्यमातून गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीवर नियंत्रण ठेवले जाते. वाहतूक पासवर नमुद परिमाणापेक्षा जादाच्या गौण खनिजाची वाहतूक वाहनांमधून होत असल्याचे निदर्शनास आलेले नाही.

नांदगांव खंडेश्वर तालुक्यात दिनांक १ एप्रिल, २०१७ ते २८ फेब्रुवारी, २०१८ या कालावधीत गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीच्या २६ प्रकरणात दंडात्मक कार्यवाही करुन रु.६,१७,१००/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जामनेर व चोपडा (जि.जळगाव) तालुक्यात नियमबाह्यरित्या राबविण्यात आलेल्या निविदा प्रक्रियेबाबत

**(२२) * १०४८९८ श्री.संजय सावकारे (भुसावळ) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जामनेर (जि.जळगाव) तालुक्यातील रस्त्यावरील खड्डे बुजविण्यासाठीच्या सात कामांची निविदा प्रक्रिया राबविण्यात आल्यानंतर उक्त कामांची पुन:श्च निविदा प्रक्रिया (रिटेंडरींग) काढून पहिल्या निविदेपेक्षा जास्त दराच्या निविदा स्वीकारल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच चोपडा (जि.जळगाव) तालुक्यातील ५ कोटी रुपयांची निविदाही नियमबाह्यरितीने बनावट कागदपत्राच्या आधारे मंजुर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या दोन्ही प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने या प्रकरणातील दोषी अधिकारी व संबंधित ठेकेदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) नमूद केलेली बाब वस्तुस्थितीशी सुसंगत नाही. काही कामांच्या निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने पुन:निविदा बोलावण्यात आल्या. प्राप्त निविदामधील निम्नतम निविदा विहित नियमांचे पालन करुन स्वीकारण्यात आल्या आहेत.

(२), (३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे हेत (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील अवैध गौण खनिज उत्खननाबाबत

**(२३) * ११५३३० श्री.नितेश राणे (कणकवली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे हेत (ता.वैभववाडी, जि.सिंधुदुर्ग) येथील श्री.रविंद्र रा.फोंडके यांच्या खाजगी मालकीच्या सर्वे क्र. १७१, हि.क्र.६ मध्ये तसेच अन्य २० शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीतून शेतकऱ्यांची फसवणूक करून कोणताही मोबदला न देता २ वर्षापासून मे.महालक्ष्मी विकासक कंपनीने महसूल प्रशासनाच्या संगनमताने गौण खनिजांचे उत्खनन केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या उत्खननामुळे शासनाच्या करोडो रूपयांच्या महसुलाचे नुकसान झाले असून श्री.रविंद्र राजाराम फोंडके यांनी मा.मुख्यमंत्री, मा.जलसंपदा मंत्री, मा.महसूलमंत्री, प्रधान सचिव, महसूल विभाग, प्रधान सचिव, जलसंपदा विभाग, जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग, तहसिलदार, वैभववाडी, कार्यकारी संचालक, कोकण पाटबंधारे विकास महामंडळ व मुख्य अभियंता, कोकण प्रदेश, जलसंपदा विभाग यांच्याकडे दिनांक ४ सप्टेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास लेखी निवेदनाद्वारे तक्रार करून न्याय मिळण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार मे.महालक्ष्मी विकासक कंपनीवर कारवाई करून त्यांच्याकडून गौण खनिजांच्या महसुलाची वसूली करण्याबाबत तसेच शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अशी आशयाची तक्रार श्री.रविंद्र रा.फोंडके यांनी केली आहे.

(२) हे खरे आहे.

(३) व (४) जलसंपदा विभागामार्फत बांधण्यात येत असलेल्या धरणाच्या ठिकाणाहून मौजे मौदे गावात जाणेसाठी सर्वे नं.१७१/०६ या क्षेत्रामधून रस्ता प्रस्तावित असून सदर क्षेत्र संपादनाखाली आहे. सदर रस्त्याच्या कामासाठी विकासक कंपनीने उत्खनन केलेल्या गौण खनिजाचा वापर रस्त्याच्या व धरणाच्या कामासाठी केलेला आहे. तसेच त्यासाठी सन २०१० पासून सदर कंपनीने रु.६,९७,००,५४७/- इतकी स्वामीत्वधनाची रक्कम शासनजमा केलेली

आहे. उक्त काम करीत असतांना सर्वे नं.१७१/०६ चे मिळकतदार यांच्या संमतीने विकासक कंपनीने दि.१२/०१/२०१५ पासून रस्त्याचे काम सुरु केले आहे. तसेच रस्त्याकरीता संपादीत केलेल्या मिळकतीचा योग्य मोबदला मिळकतदारांना देण्यात येईल असे विकासक कंपनीने मान्य केले आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबई येथील एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल कंत्राट रद्द करण्याबाबत

**(२४) * १०६४८० श्री.अजित पवार (बारामती), श्री.दिलीप वळसे-पाटील (आंबेगाव), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई येथील एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल नाक्यांचे कंत्राट रद्द करण्याबाबत मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांनी अतिरिक्त मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या समितीचा अहवाल अद्याप अप्राप्त आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर कंत्राटदारावर अद्याप कोणतीही ठोस कारवाई शासनामार्फत करण्यात आली नाही अशी तक्रार मा.विरोधी पक्ष नेता विधानपरिषद यांनी माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर तक्रारीच्या अनुषंगाने उक्त समितीचा अहवाल तातडीने सादर करून एम.ई.पी. इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीचे टोल कंत्राट रद्द करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथ शिंदे :** (१) हे खरे नाही.

(२) अशी तक्रार सार्वजनिक बांधकाम विभागास प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही.

(३) मुंबई प्रवेशद्‌वार व मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावर हलक्या वाहनांना सूट देण्याबाबत आर्थिक सुसाध्यता तपासण्यासाठी अप्पर मुख्य सचिव यांचे

अध्यक्षतेखाली समिती स्थापन केली असून त्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. समितीने शासनास सादर केलेल्या अहवालावरील निर्णय शासनाच्या विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेतील किमान क्षेत्राची अट शिथील करण्याबाबत

**(२५) * ११५५३६ श्री.पृथ्वीराज चव्हाण (कराड दक्षिण) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अनुसूचित जाती आणि नवबौद्धांना कृषी योजनांचा लाभ देण्यासाठी सुरु करण्यात आलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषी स्वावलंबन योजनेमधील लाभार्थ्यांकडे किमान १ एकर (४० गुंठे) क्षेत्र असण्याची अट असल्यामुळे अनेक शेतकरी अपात्र ठरले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यामुळे कराड (जि.सातारा) तालुक्यातील सुमारे ५ हजार अनुसूचित जातीमधील शेतकरी सदर योजनेच्या लाभापासून वंचित आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, अनुसूचित जातीमध्ये अल्पभूधारक शेतकऱ्यांची संख्या जास्त असल्याने सदर योजनेमधील किमान क्षेत्राची अट काढण्यासाठी शासनाकडे निवेदने प्राप्त होऊनही त्यावर कार्यवाही केली जात नसल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उपरोक्त योजनेचा लाभ अनुसूचित जाती आणि नवबौद्धांमधील अधिकाधिक शेतकऱ्यांना होण्याकरिता किमान क्षेत्राची अट काढून टाकण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशतः खरे आहे. अनुसुचित जाती/नवबौध्द शेतकऱ्यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेंतर्गत विशेष घटकांचा लाभ घेण्यासाठी किमान १ एकर (४० गुंठे) क्षेत्र असणे आवश्यक

असल्याची अट शासन निर्णय क्रमांक: विघयो-२०१६/प्र.क्र.१७६/४अे, दिनांक ५ जानेवारी, २०१७ मध्ये समाविष्ट आहे.

(२) कराड तालुक्यातील ४५८४ अनुसूचित जातीमधील शेतकरी लाभापासून वंचित आहेत.

(३) (४) व (५) यासंदर्भातील अट शिथील करण्याची कार्यवाही शासन स्तरावर विचाराधीन आहे.

----------------

## लातूर जिल्हयातील रस्त्यांच्या दुरुस्तीची कामे निकृष्ट दर्जाची झाल्याबाबत

**(२६) * ११४९११ श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयातील औसा-लातूर राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हामार्गाची दुरुस्तीची कामे करण्यात आली असून सदर दुरुस्तीची कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची करण्यात आल्याने रस्ते पुन:श्च खड्डेमय तसेच वाहतुकीस गैरसोयीचे होऊन अनेक अपघात घडत असल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या रस्ते दुरुस्ती कामांची शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार या रस्त्यांची दुरुस्ती करण्याबाबत तसेच रस्त्यांची निकृष्ट दर्जाची कामे करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

लातूर जिल्हयातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारितील रस्त्याच्या डांबरी पृष्ठभागावरील खड्डे भरून रस्ते वाहतुकीसाठी सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. राष्ट्रीय महामार्ग देखील आवश्यक दुरूस्त्या करून वाहतूकीस सुस्थितीत ठेवण्यात आले आहेत. रस्त्याच्या दोषामुळे अपघात झाल्याची नोंद पोलीस दफ्तरी आढळून येत नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील स्व.गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनेचे प्रस्ताव प्रलंबीत असल्याबाबत

**(२७) * ११३४१४ श्री.हर्षवर्धन सपकाळ (बुलढाणा), श्री.बाळासाहेब थोरात (संगमनेर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बुलढाणा जिल्ह्यातील स्व.गोपीनाथ मुंढे अपघात विमा योजनेचे ११५ प्रस्ताव मागील सहा महिन्यांपासून प्रलंबीत असल्याची बाब दिनांक २० जानेवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, त्यानुसार स्व.गोपीनाथ मुंढे विमा योजनेचे प्रलंबीत प्रस्ताव मंजूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) व (३) प्रस्ताव शिघ्र गतीने मंजूर होणेसाठी जिल्हास्तरावर तसेच आयुक्तालय स्तरावर विमा कंपनी व सल्लागार कंपनीचे प्रतिनिधी यांच्या बैठका घेऊन प्रकरणे निकाली काढणेस्तव सूचना देण्यात आल्या असून, त्याबाबत सातत्याने पाठपुरावा चालू आहे. तसेच जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी स्तरावर कागदपत्रांच्या पूर्ततेसाठी कार्यवाहीत असलेल्या प्रस्तावांची पूर्तता तात्काळ करुन घेऊन, विमा कंपनीकडे मंजुरीसाठी सादर करण्यात येत आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चिपळूण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील 'संक्रमण निवास' इमारतीची दुरुस्ती करण्याबाबत

**(२८) * १०५९६८ श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण (ता.चिपळूण, जि.रत्नागिरी) येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत असलेली "संक्रमण निवास" ही इमारत अत्यंत धोकादायक झाली असून या इमारतीत उपविभागीय अधिकारी, तहसीलदार व इतर महसूल विभागातील कर्मचारी कुटुंबासहीत राहत असल्याने या इमारतीच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्याची मागणी लोकप्रतिनिधींनी माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडीट करण्यात आले असून त्यामध्ये इमारतीची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत सुचविले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर इमारतीची स्ट्रक्चरल ऑडीटमध्ये सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, खरे आहे.

(२) खरे आहे.

(३), (४) व (५) सदर इमारतीचे कामाला मुख्य अभियंता, सा. बां. प्रा. वि., मुंबई यांचे मार्फत २९ लक्ष इतक्या रकमेस विविक्षित दुरुस्ती कार्यक्रमातून मंजूरी देण्यात आली आहे. तथापि, प्रस्तुत इमारतीच्या स्ट्रक्चरल ऑडीट अहवालामध्ये सदर इमारतीचा पाया सुरक्षित नसल्याचे नमूद करण्यात आले आहे.

त्यामुळे सदर इमारतीची दुरुस्ती न करता पुनर्बांधणी करणे योग्य ठरेल. या बाबतीत अधिक्षक अभियंता, संकल्प चित्र मंडळ (इमारती) सा. बां. कोकण भवन, नवी मुंबई यांचेकडून मागविलेले अंतिम अभिप्राय प्राप्त करवून त्यानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी (जि.चंद्रपुर) तालुक्यांतील भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करण्याबाबत

**(२९) * ११५६१४ ॲड.संजय धोटे (राजूरा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राजुरा, कोरपना, जिवती व गोंडपिपरी (जि.चंद्रपुर) तालुक्यांतील भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करण्याची मागणी सातत्याने करण्यात आली असल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निर्देशनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त तालुक्यातील शेतकरी उक्त जमिनीवर अनेक वर्षापासून शेती करत असतांना व सदर शेतकऱ्यांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरही सदर वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करण्यास विलंब करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त तालुक्यातील भोगवटदार वर्ग-२ जमिनी वर्ग-१ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा उपविभागातील जिवती, राजुरा व कोरपना हे तालुके स्वातंत्रपूर्व काळात निजाम स्टेट मध्ये होते. सदर उपविभागातील महसुली अभिलेखात असलेली ‘पट्टेदार’ ही नोंद विचारात घेऊन अशा स्वरूपाच्या जमिनी भोगवटादार वर्ग-१ या सत्ता प्रकारातील असल्याने शासन परिपत्रक क्र.जमीन-२०१२/प्र.क्र.१८३/ज-८, दिनांक १४ ऑगस्ट, २०१३ अन्वये उक्त जमिनीच्या संदर्भात सातबारा उताऱ्यावर योग्य तो सत्ता प्रकार अभिलिखित करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत. त्यानुषंगाने सदर तीनही तालुक्यात विशेष मोहिम राबवून ५,१६३ अर्जांपैकी ४,२०७ अर्ज निकाली काढण्यात आले असून, तद्नुसार अधिकार अभिलेख अद्ययावत करण्यात आले आहेत. उर्वरित ९५६ प्रकरणांमध्ये आवश्यक अभिलेख/कागदपत्रे उपलब्ध न झाल्याने सदर प्रकरणे प्रलंबित आहेत.

चंद्रपूर जिल्ह्यातील गोंडपिपरी तालुक्यात १८३९ प्रकरणात भोगवटादार वर्ग-२ (भूमिधारी) जमिनी भोगवटादार वर्ग-१ (भूमिस्वामी) करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे.

(५) प्रश्नच उद्भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील वाळू घाटांच्या लिलावाबाबत

**(३०) * ११२५९२ श्री.तानाजी मुटकुले (हिंगोली) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात सन २०१७-१८ या वर्षासाठी वाळू घाटांचे लिलाव विलंबाने झाले असुन काही घाटांचे लिलाव झाले नसल्यामुळे वाळूची टंचाई निर्माण होऊन शासकीय व खाजगी बांधकामे रखडली असल्याचे माहे नोव्हेंबर, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर वाळू घाटांचे लिलाव न झाल्यामुळे शासनाच्या लाखो रुपयांच्या महसूलाचेही नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीचे निष्कर्ष काय आहे व त्यानुसार हिंगोली जिल्ह्यातील वाळू घाटांचे लिलाव करुन वाळूची टंचाई दूर करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३) व (४) हिंगोली जिल्ह्यात २३ वाळूगटांकरीता माहे ऑक्टोबर, २०१७ मध्ये घेण्यात आलेल्या लिलावाच्या प्रक्रियेमध्ये फक्त १ वाळूगट लिलावात गेला. त्यामधून रू.१६,०५,४००/- एवढा महसूल प्राप्त झाला आहे. अन्य वाळूगटांसाठी लिलावाची दुसरी व तिसरी फेरी घेण्यात आली. तथापि, लिलावास प्रतिसाद मिळाला नाही.

तसेच, मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांनी दि.२१/१२/२०१७ रोजी पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) व पर्यावरणीय व्यवस्थापन योजना (EMP) याशिवाय वाळू लिलावाची सुरू असलेली प्रक्रिया

करण्यास न्यायालयाच्या पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली होती. यामुळे वाळूची काही प्रमाणात टंचाई निर्माण झाली असली तरी मागील वर्षी साठवून ठेवलेली वाळू व जप्त साठ्याच्या लिलावातून उपलब्ध झालेली वाळू व कृत्रीम वाळू वापरून काही बांधकामे झाली आहेत.

मा.उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर यांच्या दि.२१/०२/२०१८ रोजीच्या आदेशानुसार लिलाव प्रक्रियेतील स्थगिती आदेश खारीज केले असून त्यानुसार पर्यावरण आघात मुल्यांकन (EIA) व पर्यावरणीय व्यवस्थापन योजना (EMP) तयार करून वाळू गटांचे फेर लिलाव घेण्यात येत आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ रत्नागिरी यांनी डिझेल इंजिन पंप वाढीव दराने खरेदी केल्याबाबत

**(३१) * ११४५०१ डॉ.संतोष टारफे (कळमनुरी) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र कृषी उद्योग विकास महामंडळ रत्नागिरी यांनी सन २०१५-२०१६ मध्ये नॅपसॅक पॉवर डिझेल इंजिन पंप खरेदीच्या निविदांमध्ये पंप खरेदीचे दर कमी आले असतानाही महामंडळाने त्यामध्ये अनावश्यक वाढ करुन निविदेतील दरापेक्षा वाढीव दराने सदर पंप खरेदी केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या संदर्भात व्यवस्थापकीय संचालक यांनी विभागीय व्यवस्थापक, रत्नागिरी यांच्याकडे दिनांक ०५ जून, २०१७ रोजीच्या पत्रान्वये खुलासा मागितला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाढीव दराने खरेदी करुन शासनाचे आर्थिक नुकसान करणाऱ्या संबंधित दोषींविरुद्ध शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. पांडुरंग फुंडकर :** (१) अंशत: खरे आहे.

नॅपसॅक पॉवर डिझेल इंजिन पंप अशा प्रकारचे कोणतेही उपकरण नसून नॅपसॅक पॉवर स्प्रेअर व डिझेल इंजिन पंप अशी वेगवेगळी उपकरणे आहेत. नॅपसॅक पॉवर स्प्रेअर ऐवजी नॅपसॅक पॉवर स्प्रेअर (आयटम कोड-२३) व हाय प्रेशर नॅपसॅक स्प्रेअर (आयटम कोड-४०) या दोन्ही विवरण उपकरणाच्या निविदा महामंडळास प्राप्त झाल्या होत्या. या दोन्ही आयटमचे तांत्रिक मापदंडामध्ये फरकाची माहिती महामंडळ अथवा कृषि आयुक्तालयाकडन उपलब्ध झालेली नाही. वरील नमूद दोन्ही आयटम पैकी नॅपसॅक पॉवर स्प्रेअरसाठी रु. ११,०३७/- ते रु. २३,६००/- प्रति नग व हाय प्रेशर नॅपसॅक स्प्रेअरसाठी रु. ६,६००/- ते रु. ९,१५०/- प्रति नग असे दर प्राप्त झाले होते. तथापि, महामंडळाने फक्त नॅपसॅक पॉवर स्प्रेअर करिता रु. १२,८०६/- प्रति नग अशा दराची शिफारस केली व तत्कालिन कृषि संचालक (निवगुनि) यांच्या अध्यक्षतेखालील तांत्रिक समिती यांनी कोणतीही तपासणी न करता त्याप्रमाणे प्राप्त दराची राज्यस्तरीय समितीस शिफारस केली. त्यासअनुसरुन राज्यस्तरीय दर निश्चिती समिती ने प्रस्तावित दरास मान्यता दिली.

सन २०१५ -१६ मध्ये या दोन्ही उपकरणांची खरेदी झालेली नाही. सन २०१६-१७ मध्ये महामंडळाने त्यांच्या स्तरावर हाय प्रेशर नॅपसॅक स्प्रेअर चे रु. ७,७७०/- या प्रमाणे दर असल्याचे पत्र निर्गमित केले व त्याप्रमाणे खरेदी केली. अशीच वस्तुस्थिती डिझेल इंजिन पंपाच्या बाबतीत दिसून येते.

(२) होय.

(३) होय.

(४) सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली असून महामंडळातील कृषि अभियांत्रिकी विभाग व लेखा विभागाचे प्रमुख व निविदा छाननीचे इतर सदस्य तसेच कृषि आयुक्तालय येथील कृषि संचालक (निवगुनि) यांनी संगनमताने पुरवठादार कंपन्यांना गैर आर्थिक लाभ मिळवून देण्याचे नियोजन केले असल्याचे प्रथमदर्शी दिसून येते. महामंडळ यांनी जरी सुधारीत दर जारी केला व कमी दराने साहित्याची खरेदी केली असेल तरी खरेदी केलेले आयटमचा आयटम कोड बदलेला आहे व त्या आयटमचे दर निविदा प्रक्रियेत प्राप्त किमान दरापेक्षा

जास्त असल्याचे दिसुन येते. म्हणुन आयुक्त (कृषि) याना सहायक संचालक लेखा यांच्या मदतीने प्राथमिक चौकशी करणे चे आदेश देण्यात येत आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे मानमोड, घानमोड आणि पांढरदेव (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावांचे पुनर्वसन करण्याबाबत

**(३२) * १११९८९ डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे मानमोड, घानमोड आणि पांढरदेव (ता.चिखली, जि.बुलढाणा) या तिन्ही गावांमधील जमिनीचे पेनटाकळी प्रकल्पासाठी भूसंपादन होऊनही अद्याप या गावांचे पुनर्वसन झाले नसल्याचे माहे जानेवारी, २०१८ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच मौजे पांढरदेव या गावाचे अंशतः पुनर्वसन मंजूर झालेले असताना उक्त प्रकल्प सन २०१० मध्ये पूर्ण होऊनही प्रकल्प बाधितांच्या पुनर्वसनाची कार्यवाही अदयाप झालेली नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या गावांचे तात्काळ पुनर्वसन व्हावे याकरिता ग्रामस्थांनी संबंधितांकडे निवेदने देऊन पाठपुरावा करुनही याबाबत कोणतीही कार्यवाही होत नसल्याने प्रकल्पबाधित जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करुन आंदोलन करणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, याबाबत चौकशी करुन उपरोक्त गावांचे तातडीने पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२), (३) व (४) पेनटाकळी प्रकल्पाच्या पश्चजलामुळे अशंत बाधित झालेल्या पांढरदेव (ता.चिखली, जि.बुलढाणा) या गावाचे अंशत: पुनर्वसन खास बाब म्हणून करण्यास सन २०१० मध्ये मंजूरी देण्यात आली असून सदर गावाचे पुनर्वसन प्रगतीपथावर आहे.

मौजे मानमोड, घानमोड या पूर्णत: बाधित गावांचे पुनर्वसन करतवाडी येथील “ई” क्लास जमिनीमध्ये करणात येत असून सदर जमिनीवरील अतिक्रमण काढण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पालघर जिल्ह्यातील आदिवासींनी भूसंपादनाविरोधात काढलेल्या मोर्चाबाबत

**(३३) * ११३६३८ श्री.विलास तरे (बोईसर), श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी (वाढवण बंदर, अहमदाबाद-डहाणू चौपदीकरण, पालघरमधून जाणारी बुलेट ट्रेन) संपादित केल्या जाणार असल्यामुळे हजारो आदिवासींनी माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा दरम्यान जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन केले होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार पालघर जिल्ह्यातील आदिवासींच्या जमिनी विविध प्रकल्पांसाठी संपादित न करण्याबाबत तसेच आदिवासींच्या इतर समस्या सोडविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) पालघर जिल्ह्यामध्ये वाढवण बंदर या प्रकल्पाकरीता जमीन संपादन करण्याबाबत कोणताही प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर यांचेकडे प्राप्त झालेला नाही. अहमदाबाद-डहाणू चौपदरीकरण प्रकल्प कार्यान्वित नसून विरार-डहाणू रेल्वे चौपदरीकरण प्रकल्प कार्यान्वित आहे. सदर प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील पालघर, डहाणू व वसई या तालुक्यातील एकूण २८ गावातील ४१.०४.८८ हे. आर. इतकी जमीन संपादित करण्यात येत आहे. तसेच

मुंबई-अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे (बुलेट ट्रेन) करीता पालघर जिल्ह्यातील एकूण ६४ गावांचा प्रस्ताव जिल्हाधिकारी, पालघर कार्यालयास प्राप्त झालेला असून सदर प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील एकूण २०७.१२.८८ हे. आर. इतकी खाजगी जमीन संपादित करण्यात येत आहे.

तसेच पालघर जिल्ह्यामध्ये मुंबई-वडोदरा राष्ट्रीय द्रुतगती महामार्ग प्रकल्पासाठी एकूण क्षेत्र १०८०.२६.४ हे.आर. संपादित करावयाचे असून पालघर तालुक्यातील १२ गावांतील ग्रामस्थांनी विरोध दर्शविल्यामुळे अधिसूचना व्यपगत झाल्याने पुन:श्च अधिसूचना प्रसिद्ध करण्याची कार्यवाही सुरु आहे.

उक्त आवश्यक जमिनी ह्या नवीन भूसंपादन कायदा, २०१३ तसेच शासन निर्णय, दि.१२.०५.२०१५ नुसार खाजगी वाटाघाटीद्वारे थेट खरेदी पद्धतीने करण्यात येत असून त्यानुसार संबंधितांना मोबदला अदा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## धुळे जिल्ह्यात राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या चौपदरीकरणाच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३४) * १०९९९५ श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ च्या चौपदरीकरणासाठी शासनाने धुळे जिल्ह्यातील धुळे व साक्री तालुक्यातील राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६ च्या दोन्ही बाजूलगत असलेल्या जमिनी संपादित केल्या असून सदर संपादित जमिनीच्या मोजणी प्रक्रियेत उप अधिक्षक, भूमि अभिलेख, साक्री व त्यांचे अधिपत्याखालील मोजणीदारांनी मोजणी शीट तयार करतांना स्थानिक एजंटच्या सहकार्याने गैरव्यवहार केला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दहिवेल येथील गट नं.९५ चे ९५/१, ९५/२, ९५/३ व ९५/४ ची दहा वर्षापूर्वी वाटणी झाली असतांना संबंधितांनी ९५ पैकी अशी नोंद दर्शवून ९५/३ व ९५/४ इत्यादीमधील जमिनधारकांना मोबदला दिला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त प्रकरणातील संबंधित अधिकारी व इतर दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

मौजे दहिवेल ता. साक्री, जि. धुळे येथील ग.नं.९५/१ व ९५/२ मधील राष्ट्रीय महामार्ग क्र.६ साठी संपादन मोजणी मधील घोटाळयाबाबत आमदार श्री.डी.एस.अहिरे यांनी दि.०४/०९/२०१७ व दि.०१/०१/२०१८ रोजी अनुक्रमे जिल्हाधिकारी, धुळे व जिल्हा अधिक्षक, भुमि अभिलेख धुळे यांचेकडे तक्रार केलेली आहे.

सदर प्रकरणामध्ये स्थानिक एजंटच्या सहकार्याने गैरव्यवहार झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तथापी सदर प्रकरणामध्ये संयुक्त मोजणी अहवालामध्ये तफावत आढळून आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

उपअधिक्षक, भूमिअभिलेख, साक्री ता.धुळे यांचेकडील संयुक्त मोजणी अहवाल जा.क्र.मोरनं.३१९/२०१२ दि.२७/८/२०१२ अन्वये मौजे दहिवेल येथील ग.नं.९५/१ पैकी ४००० चौ.मी. व ९५/४ पैकी २००० चौ.मी. क्षेत्र राष्ट्रीय महामार्ग क्र.६ साठी संपादीत होत असल्याबाबत अहवाल देण्यात आला. त्यानुसार सक्षम प्राधिकारी भूसंपादन तथा उपजिल्हाधिकारी भूसंपादन (सामान्य) धुळे यांनी दि.१५/५/२०१३ रोजी अंतिम निवाडा पारित केला व दि.१६/३/२०१६रोजी ग.नं.९५/१ चे कब्जेदार पुंडलिक हरी कोकणी यांच्या वारसांना भुसंपादन मोबदला रक्कम रू.२०,०३,६२१/- अदा करण्यात आली. सदर निवाडयात ग.नं.९५/४ पैकी २००० चौ.मी. क्षेत्र संपादीत करण्यात आलेले होते. तथापि उपअधिक्षक, भुमिअभिलेख यांचेकडील दुरूस्त संयुक्त मोजणी पत्रक दि.११/८/२०१४ अन्वये ग.नं. ९५/३ व ९५/४ या गटामधुन कोणतेही क्षेत्र संपादित होत नसल्याचा अहवाल सादर करण्यात आला. त्यामुळे सक्षम प्राधिकारी भुसंपादन यांनी ग.नं. ९५/४ बाबत शुध्दीपत्रक पारित करून सदर गटाची भुसंपादन मोबदला रक्कम रू.९,९९,९००/- म.प्रकल्प संचालक, राष्ट्रीय महामार्ग क्र.६ धुळे यांचेकडे परत केली. त्यामुळे ग.नं.९५/३ व ग.नं.९५/४ च्या कब्जेदारांना कोणतीही रक्कम अदा करण्यात आलेली नाही.

(३) या बाबत उपसंचालक भुमिअभिलेख नाशिक यांचे स्तरावर कार्यवाही सूरू आहे. तसेच मूळ व दुरूस्ती संयुक्त मोजणी कामाची फेर मोजणी व तपासणी करण्याची कार्यवाही सूरू आहे.
(४) प्रस्तुत विधानसभा प्रश्नाच्या अनुषंगाने उपसंचालक भूमिअभिलेख, नाशिक प्रदेश नाशिक यांनी संबंधित प्रकरणांची पडताळणी करून संयुक्त मोजणी नकाशा व पत्रकात सदोषपणे क्षेत्र दर्शविलेने ४ कर्मचाऱ्यांना दि.०३/०३/२०१८ रोजीच्या आदेशाने निलंबीत केले आहे व त्यांचे विरूध्द विभागीय चौकशीची कार्यवाही सुरू करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे गट ब संवर्गातील दोषी व विभागीय चौकशीस पात्र असलेल्या अधिकाऱ्यांविरूध्द कारवाईबाबत प्रस्ताव उपसंचालक भूमिअभिलेख नाशिक यांचेकडून जमाबंदी आयुक्त, पुणे यांचेकडे सादर करण्यात येत आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजा भंडारा, खास (जि.भंडारा) येथील मातीच्या अवैध उत्खननाबाबत

**(३५) * १०८७५१ श्री.रामचंद्र अवसरे (भंडारा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा भंडारा, खास (जि.भंडारा) येथील गट नं. ३१८, ३२४, ३९२ व ४०० मधुन कार्यकारी अभियंता गोसेखुर्द पुनर्वसन विभाग, अंबाडी, भंडारा यांच्या लेखी निर्देशाप्रमाणे कंत्राटदार कंपनी मे. मेटकॅप इंजिनिअरींग, प्रा. लि. मुंबई व उर्जाटेक ईन्फ्रास्ट्रक्चर, लि. मुंबई यांनी अनधिकृत मातीचे उत्खनन व वाहतूक केल्याने शासनाची रॉयल्टी व दंड शासन जमा करण्याबाबत तहसिलदार, भंडारा यांनी दिनांक ०७ ऑक्टोबर, २०११ रोजी वा त्या सुमारास आदेश पारीत केला होता, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यानंतर सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालय, नागपूर यांच्या आदेशाप्रमाणे तहसिलदार, भंडारा यांनी फेर चौकशी करून पारीत केलेल्या आदेशाविरूद्ध सदर विभागाने उपविभागीय अधिकारी कार्यालय, भंडारा येथे अपिल दाखल केले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर अपील उपविभागीय अधिकारी कार्यालयाने अमान्य केले असून त्यानंतर १० ते ११ महिन्यांचा कालावधी झाला असतानाही उपरोक्त कंपन्यांनी रॉयल्टी व दंड भरला नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीनुसार मे. मेटकॅप इंजिनिअरींग, प्रा. लि. मुंबई व उर्जाटेक ईन्फ्रास्ट्रक्चर, लि. मुंबई यांच्याकडून रॉयल्टी व दंड वसूल करण्याबाबत तसेच या प्रकरणातील संबंधित दोषी अधिकाऱ्यांविरुद्ध कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) मौजा भंडारा खास, जि.भंडारा येथील गट नं. ३१८ ते ३२४, ३९२ ते ४०० येथील गोसेखुर्द प्रकल्पांतर्गत संपादीत जमिनीतून मातीचे अवैध उत्खनन व वाहतूक केल्याबद्दल कार्यकारी अभियंता, गोसेखुर्द पुनर्वसन विभाग, अंबाडी, भंडारा यांनी रुपये १९,०६,७४,७४४/- इतका दंड व स्वामीत्वधनाची रक्कम संबंधित कंपनीकडून वसूल करुन शासनजमा करण्याचे तहसीलदार, भंडारा यांनी दि.७ ऑक्टोबर,२०११ रोजी दंडात्मक आदेश पारीत केले आहेत.

(२) व (३) हे खरे आहे.

(४) व (५) उपविभागीय अधिकारी, भंडारा यांचे दि.२३/२/२०१७ च्या आदेशाविरुध्द कार्यकारी अभियंता, गोसेखुर्द पुनर्वसन विभाग, अंबाडी, भंडारा यांनी अपर जिल्हाधिकारी, भंडारा यांचेकडे अपील दाखल केले असता सदर अपील खारीज करुन अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतूकीचा दंड व स्वामीत्वधनाची रक्कम भरण्याचे उप विभागीय अधिकारी यांचे आदेश दि.२९/१/२०१८ अन्वये कायम करण्यात आले आहेत.

सदरहू रक्कम त्वरीत शासनजमा करण्याकरीता जिल्हाधिकारी, भंडारा यांनी कार्यकारी संचालक, विदर्भ पाटबंधारे विकास मंडळ, सिंचन सेवा भवन, नागपूर यांना दि.१३/१२/२०१७ व दि.९/१/२०१८ च्या अर्धशासकीय पत्रान्वये देखील कळविण्यात आले आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## कुंभोज-हातकणंगले (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) या रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(३६) * ११४२७१ डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कुंभोज-हातकणंगले (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) हा रस्ता अत्यंत धोकादायक झाला असून या रस्त्याचे रुंदीकरण करण्याची मागणी तेथील नागरिकांनी वारंवार संबधित अधिकाऱ्यांकडे केल्याचे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीनुसार सदर रस्त्याची दुरुस्ती व रुंदीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) अंशत: खरे आहे.

रस्त वाहतुकीस सुस्थितीत आहे. तथापि रस्त्याच्या रुंदीकरणाची मागणी स्थानिक नागरिकांनी दि.२०.११.२०१७ रोजीच्या पत्रान्वये केली आहे.

(२) होय.

(३) सदर रस्त्याची दुरूस्ती करण्यात आली असून मार्च, २०१८ च्या अर्थसंकल्पात सदर रस्त्याच्या मजबुतीकरणाचे काम समाविष्ट करण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सातपाटी-पालघर-विक्रमगड-खोडाळा-देवगांव-घोटी-सिन्नर-शिर्डी या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत

**(३७) * १०८८३२ श्री.क्षितीज ठाकूर (नालासोपारा), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई), श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातपाटी-पालघर-विक्रमगड-खोडाळा-देवगांव-घोटी-सिन्नर-शिर्डी या रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबतची मागणी लोकप्रतीनीधींनी दिनांक २१ डिसेंबर, २०१७ रोजी वा त्यासुमारास मा.सार्वजनिक बांधकाम मंत्री यांचेकडे लेखी निवेदनाद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने याबाबत चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार उक्त रस्त्याचे चौपदरीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील** : (१) अशा आशयाचे निवेदन प्राप्त झाले आहे, हे खरे आहे.

(२) होय.

(३) प्रश्नाधीन रस्त्यापैकी सिन्नर-शिर्डी हा राष्ट्रीय महामार्ग १६० चा भाग आहे, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत हया रस्त्याच्या चौपदरीकरणाचा रु.८८० कोटी किंमतीचा प्रकल्प अहवाल मंजूर करण्यात आला असून चौपदरीकरणासाठी निविदा प्रक्रीया तसेच आवश्यक अतिरिक्त भुसंपादनासाठी संयुक्त मोजणीची कार्यवाही प्रगतीत आहे. तसेच सिन्नर-घोटी हा रस्ता रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या दि.२५/१२/२०१७ च्या अधिसुचनेनुसार राष्ट्रीय महामार्ग १६० अ म्हणून घोषित झाला असून भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणामार्फत भारतमाला योजनेमधून हया रस्त्याच्या चौपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही प्रगतीत आहे, असे प्रकल्प संचालक, भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण, नाशिक यांनी कळविले आहे.

तसेच प्रश्नांकित रस्त्यांपैकी विक्रमगड मनोर पालघर व आहुर्ली घोटी हे रस्ते, रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्रालयाच्या दि.०६/०२/२०१८ च्या अधिसुचनेनुसार वाढविलेल्या राष्ट्रीय महामार्ग १६० अ चा भाग असून त्याच्या पेव्हड शोल्डरसह दुपदरीकरणासाठी सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करण्याची कार्यवाही मुख्य अभियंता, राष्ट्रीय महामार्ग यांचेमार्फत प्रगतीत आहे. तसेच प्रश्नांकित रस्त्यापैकी विक्रमगड-खोडाळा-देवगांव हा राज्यमार्ग आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे सत्पाळा (ता.वसई, जि.पालघर) येथील शासकीय जमिनीवरील अनधिकृत बांधकामाबाबत

**(३८) * ११५७८० श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे सत्पाळा (ता.वसई, जि.पालघर) येथील जूनी भूमापन क्र.३२२ अ भूमापन क्रमांकाच्या उपविभाग १ व नवीन भूमापन क्र १३६ क्षेत्र १.३४.० खजण (सुमारे साडेतीन एकर) शासकीय जमीन भूमाफीयांनी बळकावून या भूखंडावर मोठ्या प्रमाणावर अनधिकृतपणे बंधारे बांधल्याचे व मातीचा भराव टाकल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासनाची दिशाभूल करुन सदरहू जागेवर केल्या गेलेल्या या अनधिकृत बंधाऱ्यामुळे भरतीचे पाणी व पावसाळी पाण्याचा होणारा नैसर्गिक निचरा बंद होणार असुन परिसरातील शेतकऱ्यांच्या बागायती शेतीत भरतीचे पाणी शिरुन जमीनी क्षारयुक्त होऊन परिसरातील विहीरीही खाऱ्या पाण्यामुळे दूषित होत आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच या शासकीय जागेला लागून आदिवासी एकता पाडा, संभाळेपाडा, भंडार आळी, तेली आळी, सोनार आळी, खलार आदी परिसरातील लोकवस्तीला पावसाळयात पुराच्या पाण्याचा धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाल्याने तेथील ग्रामस्थ व लोकप्रतीनिधींनी तलाठी, वटार, सटपाळा, तहसिलदार, वसई, जिल्हाधिकारी, पालघर यांच्याकडे लेखी तक्रार करुन भूमाफियांवर कारवाई करण्याची मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास याबाबत चौकशी करुन उक्त ठिकाणचे अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत तसेच अनधिकृत बांधकाम करणाऱ्या भूमाफियांवर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे सत्पाळा, ता.वसई जि.पालघर येथील नवीन भूमापन क्र.१३६ मधील क्षेत्र १-३४.० हे-आर ही खांजण जमीन भुमाफियांनी गिळंकृत केल्याबाबतची तक्रार, माजी उपसभापती

पंचायत समिती, वसई यांनी दिनांक ३०.०१.२०१८ च्या पत्रान्वये तलाठी, साझा वटार-सत्पाळा यांचेकडे केली आहे. त्यानुषंगाने तहसिलदार,वसई यांनी दिनांक ०१.०३.२०१८ अन्वये स.नं.१३६/१ या खांजण जमिनीलगत स.नं.१९०/अ व १९०/२/१ पै या खाजगी जमिनी असून सदर जमीनधारकांनी शेतजमिनीत खारेपाणी येऊ नये म्हणून बांधबंधिस्ती केली आहे. तथापि सदर जागेवर बंधारा बांधलेला नाही. तसेच सदर ठिकाणी असलेल्या आदिवासी पाड्यांमध्ये पावसाळ्यामध्ये पूरस्थितीत पाणी शिरत असते, मात्र शेत जमिनीत खारे पाणी येऊ नये यासाठी बांधबंधिस्ती केली असल्याने आदिवासी पाडे पाण्याखाली जाण्याची बाब दिसून येत नाही. वसई गावातील खारजमिनीचे संरक्षणासाठी वठार खारभूमी योजना कार्यान्वित असून योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रात सत्पाळा व वठार गावातील ९१ हे.आर क्षेत्राचा समावेश असून सदर योजनेमुळे खारे पाणी शिरुन जमीन क्षारयुक्त होत नाही. बांधबंदिस्ती केलेली जागा शासकीय खांजण आहे किंवा कसे याबाबत उप अधीक्षक, भूमी अभिलेख, वसई यांना मोजणी करणेबाबत तहसीलदार, वसई यांनी दिनांक २३.०२.२०१८ च्या पत्रान्वये कळविले असून मोजणीअंती पुढील कार्यवाही करणेचे संकल्पित आहे.

-----------------

## नांदूरमधमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदावरी कालव्याकरिता शेतकऱ्यांच्या संपादित केलेल्या जमिनीसाठी पर्यायी जमिनी देण्याबाबत

**(३९) * ११४८२४ श्रीमती सीमाताई हिरे (नाशिक पश्चिम) :** सन्माननीय **मदत व पुनर्वसन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदूरमधमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदावरी कालव्याकरिता सन १९९७ मध्ये निफाड तालुक्यातील तास येथील शेतकऱ्यांच्या शेतजमिनी संपादित करण्यात आल्या असून सदरहू शेतकरी भूमीहीन होऊ नये याकरीता शासनाने त्यांना पर्यायी जमिनी देण्याचे लेखी पत्र देवून पुनर्वसनाची हमी दिली होती, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर भुसंपादन होऊन प्रदीर्घ कालावधी झालेला असताना व मा.उच्च न्यायालयाने याबाबत आदेश दिले असतानाही जिल्हा प्रशासनाने या शेतकऱ्यांना पर्यायी जमिनी देवून त्यांचे पुनर्वसन केले नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करुन या प्रकल्पबाधित भूमीहीन शेतकऱ्यांना जमिनी देऊन त्यांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) व (३) नांदूरमध्यमेश्वर (ता.निफाड, जि.नाशिक) येथील गोदावरी कालव्याकरीता सन १९९९ मध्ये निफाड तालुक्यातील तास येथील जमिन भूसंपादनाच्या बदल्यात श्री.केशव बबेराव तासकर व इतर २ यांचे जागा मागणी प्रस्तावावर मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जिल्हाधिकारी कार्यालय नाशिक यांनी शासनास सादर केलेल्या प्रस्तावाबाबत शासनाने कार्यवाही करण्याबाबत निदेश दिले असून त्याअनुषांगाने शासन स्तरावर कार्यवाही सूरू आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## घोटी बु. ते पारे (जि.सांगली) या घाट रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत

**(४०) * १०९३२९ श्री.अनिल बाबर (खानापूर) :** सन्माननीय **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोटी बु. ते पारे (जि.सांगली) या दुर्गम डोंगराळ भागातून जाणाऱ्या घाट रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्यावर अपघाताचे प्रमाण वाढले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उपरोक्त घाट रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री महोदयांकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान पत्रव्यवहार करूनही कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त घाट रस्त्यासाठी निधीची तरतूद करून तातडीने रस्त्याची दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) मार्च २०१७ च्या अर्थसंकल्पात द्विवार्षिक देखभाल दुरूस्ती अंतर्गत प्रश्नांकित रस्त्याच्या रू.३००.०० लक्ष किंमतीचे मजबुतीकरण व डांबरीकरणाचे काम मंजूर असून सद्यस्थितीत प्रगतीत आहे तसेच सदर घाट रस्त्याची आय.आर.सी. मानकाप्रमाणे करावयाच्या दुरूस्तीचे काम निकष, मंजूरी व निधी उपलब्धतेच्या अधीन राहून हाती घेण्याचे नियोजन आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## सोनगाव शिवनी (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) पाटबंधारे प्रकल्पग्रस्तांना जमिनीचा मोबदला देण्याबाबत

**(४१) * ११५३४१ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.रणजीत कांबळे (देवळी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगाव शिवनी (ता.चांदुर रेल्वे, जि.अमरावती) पाटबंधारे प्रकल्पांतर्गत भु.स.प्र.क्र. ८०/४७/२०११-१२ मौजा कळमजापूर व भु.स.प्र.क्र. ८३/४७/२०११-१२ मौजा कळमगाव येथील भुधारकांना १.५ या गुणांकाने मोबदला मिळण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १२ फेब्रुवारी, २०१८ रोजी वा त्या सुमारास लेखी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, येथील शेतकऱ्यांच्या जमिनीचा मोबदला प्रलंबीत असल्यामुळे प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे काम गत वर्षापासून रखडले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार उक्त शेतकऱ्यांना १.५ गुणांकाने जमिनीचा मोबदला देऊन सोनगाव शिवनी पाटबंधारे प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे काम पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रकांत पाटील :** (१) होय, हे खरे आहे.

(२), (३), (४) व (५) सदर प्रकल्पासाठी संपादित जमिनीचा अंतीम निवाडा घोषीत करण्यात आला असून मोबदला वाटपाची कार्यवाही पूर्ण झाली आहे.

प्रकल्पाच्या मुख्य कालव्याचे कि.मी. १ ते ८ मधील मातीकाम व बांधकाम माहे डिसेंबर, २०१६ मध्ये सुरु करण्यात आले. सद्य:स्थितीत ५० % कालव्याचे काम पुर्ण करण्यात आले आहे. उर्वरीत काम माहे जून, २०१८ अखेर पर्यंत पुर्ण करण्याचे नियोजन आहे.मौजा कळमगांव व कळमजापुर येथील शेतकऱ्यांकडून तहसिलदार, चांदूर रेल्वे यांचेमार्फत ताबा घेण्याची कार्यवाही सुरु आहे. ताब्याप्रमाणे कालव्याचे काम माहे फेब्रुवारी, २०१८ ला सुरु करण्यात आलेले आहे.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.